नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 02/02/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावर एमआयडीसी बायपास चौक गुप्ताजी ढाब्याचे समोर येथे दिनांक 01/02/2021 चे 11:00 वा. ते 11.30 वा. दरम्यान सीजी– 04/जेडी– 8225 क्रमांकाची ट्रेलरचा चालक आरोपीने ताब्यातील ट्रेलर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच– 40/एएस– 9750 क्रमांकाच्या मोटारसायकला धडक दिली. या अपघातात मोटारसायकल चालक युवराज लाड, रा. मिनाश्री टाकीज जवळ सावनेर हा टेलरच्या मागील चाकाखाली आल्याने त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शाम छंगुलाल गुप्ता, वय 42 वर्ष, रा. डोंगरे लेआउट एमआयडीसी कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. सहकलम 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री खडसे हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 5 कि.मी. अंतरावर मौजा सावंगी रोडवर फ्लायओवर पुलाचेजवळ येथे दिनांक 31/01/2021 चे 20:00 वा. ते 20.30 वा. दरम्यान कंटेनर चालक आरोपी नामे– पप्पुभाई, रा. हाथरस जि. अलीगड उतर प्रदेश याने आपल्या ताब्यातील कंटेनर क्र. एचआर– 47/डी– 7084 हा भरधाव वेगाने व निष्काळजीपणे दारूच्या नशेत चालवुन सावंगी रोडवर फ्लायओवर पुलाच्या ठिकाणाचा अडथळा पार करून अर्धवट बांधकामाचे ठिकाणी येवुन धडक दिली. त्यामुळे आरोपी कंटेनर चालक हा गंभीर जखमी झाला. त्याला मेयो हॉस्पीटल नागपुर येथे उपचारकामी भरती केले असता उपचारा दरम्यान दि. 01/02/2021 चे 05.00 वा. सुमारास मरण पावला. आरोपी हा स्वताचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विजय प्रभाकर दुर्गे, वय 36 वर्ष, रा. नांदेवेरा रोड भांडेकर ले आउट वणी जि. यवतमाळ ह.मु. ब्राम्हणी गामपंचायत जवळ कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री खडसे हे करीत आहे.

3) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 5 कि.मी. अंतरावर मौजा घोगला शिवार येथे दिनांक 24/01/2021 चे 19:30 वा. ते 20.00 वा. दरम्यान अज्ञात आरोपी मोटरसायकल चालक आरोपीने आपले मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–40/टी–0636 क्रमांकाच्या मोटरसायकला समोरून धडक दिली. या अपघातात मोटरसायकलचा चालक नामे– राजु चिंतामन भुरसे, वय 43 वर्ष, रा. डोरली भिंगारे याचे गंभीर जखमी होवुन दवाखान्यात उपचारा दरम्यान मरण पावला. तर मोटरसायकलचे मागे बसलेला फिर्यादी जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कवडु बापुराव बारमाटे, वय 50 वर्ष, रा. पारडी देशमुख वार्ड क्र. 3 ता. कळमेश्वर जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री मुंडे हे करीत आहे.

4) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 5 कि.मी. अंतरावर मालु पेपर मालेगाव शिवार सावनेर येथे दिनांक 01/02/2021 चे 19:15 वा. दरम्यान एमएच– 40/ एल– 1561 क्रमांकाचा ट्रैक्टरचा चालक आरोपी नामे– नितीन शंकर मंगरूले, वय 32 वर्ष, रा. झेंडा चौक पहलेपार सावनेर याने आपले ताब्यातील ट्रैक्टर हायवे क 47 रोडवर उभा करून दिशादर्शक फलक इंडिकेटर रिप्लेक्टर सुरक्षतेच्या दृष्टीने कोणत्याही चिंन्हाचा वापर न करता रोडवर उभा करून ठेवल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण केला. त्यादरम्यान एम एच– 40/बी ए– 0817 क्रमांकाच्या हिरो स्पेन्डर प्लस वरील दोन्ही इसम उभ्या ट्रैक्टरला जावुन धडकले. या अपघातात मोटरसायकल चालक मृतक नामे– राकेश खुशाल शेन्डे, वय 41 वर्ष, रा. मानेगाव व मृतक नामे– शंकर दामोदर देवळे, वय 27 वर्ष, रा. पाटणसावंगी हे दोघेही घटनास्थळी मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शेषन खुशाल शेन्डे, वय 39 वर्ष, रा. विद्यानगर कोराडी रोड नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि पाटील 8805253982 हे करीत आहे.

5) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावर मौजा देवलापार एनएव 44 नागपूर जबलपुर सर्वीस रामटेक येथे दिनांक 31/01/2021 चे 19:00 वा. ते 19.15 वा. दरम्यान मृतक/आरोपी नामे– केशव आनंदराव मांढरे, वय 45 वर्ष, रा. पुसदा पुर्णवसन देवलापार हा त्याच्या ताब्यातील एमएच– 40/जी–7114 क्रमांकाच्या हिरो होन्डा कंपनीची पेशन प्लस मोटरसायकलने पवनी कडुन देवलापार कडे येत होता. त्यादरम्यान आरोपीने आपल्या ताब्यातील मोटरसायकल रॉगसाईडने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे सर्वीस रोडचे डिव्हायडर वर चडवुन डिव्हायडरचे नालीमध्ये मोटरसायकल उसडल्याने मृतक हा सिमेंट डिव्हायडरवर डोक्याचे भारावर पडल्याने त्याच्या डोक्याला व दोन्ही पायाला टोंगळयाला जब्बर मार लागुन रक्त निघाल्याने तो मरण पावला. या अपघातात आरोपी हा स्वतःचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा अशोक उईके पो. स्टे. देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि प्रविन बोरकुटे 9545667223 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 13 कि. मी. अंतरावर मौजा दुधा शिवार येथे दिनांक 28/01/2021 चे 16.00 वा. दरम्यान प्रतिक बाळुजी निनावे(मृतक), वय 23 वर्ष, रा. दुधा हा क्रेशर मशिनवर चना तुरी काढण्याचे काम करीत होता. प्रतिक निनावे हा दुधा शिवारात असलेल्या अश्वीन महादेव कगांली, रा. दुधा यांचे शेतात क्रेशर मशिनमध्ये चना तुरीचे बंडल टाकत असता त्याचे पाय मशिमध्ये लोखंडी पटयात फसुन डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली. त्यास प्रथम उपचाराकामी मेडिकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. 29/01/2021 चे 10.31 वा. तो मरण पावला. संबधीत कागदपत्रावरून सदर  मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– योगेश बाळुजी निनावे, वय 23 वर्ष, रा. दुधा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार असलम नौरंगाबादे 8668816049 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर वार्ड क्र. 1 हनुमान नगर, कन्हान येथे दिनांक 01/02/2021 चे 11.30 वा. दरम्यान फिर्यादींची आई नामे– लक्ष्मीबाई देवरावजी नागपुरे(मृतक), वय 50 वर्ष, रा. वार्ड नं. 1 हनुमान नगर, कन्हान या घरातील जागा शेनानी सारवत असतांना छपरी मध्ये ठेवलेला कुलर बंद स्थितीत त्याचा वायर ईलेक्ट्रीक बोर्डाला लागुन होता कुलरचे खाली सारवत असता लक्ष्मीबाई नागपुरे यांना करंट लागल्याने त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– उमेश देवरावजी भोयर, वय 26 वर्ष, रा. वार्ड नं. 1 हनुमान नगर, कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक राहुल रंगारी 9527131556 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर